महाबितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२०००५एसजीसी१५३६४५

दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**क्र. पी.आर-३/सबसिडी/** -22562 **दिनांक:** 20 MAY 2015

**वाणिज्य परिपत्रक क्र.** २४२

**विषय :-** राज्यात माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१४ मध्ये अवेळी पाऊस व गारपीट यामुळे आपद्ग्रस्त कृषीग्राहकांना वीज बिलात सवलत देण्याबाबत.

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र. सीएलएस २०१५/प्र.क्र. २/म-३ दिनांक ०४/०२/२०१५.

राज्यात माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१४ मध्ये अवेळी पाऊस व गारपीट यामुळे झालेल्या जीवीत व वित्तहानीपोटी आपद्ग्रस्तांना मदत देण्याबाबत शासनाने संदर्भातील शासन निर्णयानुसार निर्णय घेतलेला आहे. सदर निर्णयानुसार माहे नोव्हेंबर-डिसेंबर २०१४ या कालावधीत अवेळी पाऊस व गारपीट यामुळे बाधित कृषी ग्राहकांना त्यांचे तिमाही वीज बिलात माफी देण्याबाबत निर्देशित केलेले आहे.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते की, माहे नोव्हेंबर-डिसेंबर २०१४ या कालावधीत अवेळी पाऊस व गारपीट यामुळे बाधित गावांची व कृषी ग्राहकांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अथवा सक्षम स्थानिक महसूल अधिका-यांकडून प्राप्त करुन घेण्यात यावी व बाधित कृषी ग्राहकांना जानेवारी, फेब्रुवारी व मार्च -२०१५ या त्रैमासिकाची वीज देयके माफ करण्यात यावीत. मार्च -२०१५ चे त्रैमासिक वीज बिल यापुर्वीच निर्गमित झालेले असल्यास सदर सवलत पुढील त्रैमासिक वीज बिलात समायोजित करण्यात यावी. तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून वरील शासन निर्णयाप्रमाणे वीज देयके वितरीत करण्यात यावी.

शासन आदेशाप्रमाणे आपद्ग्रस्त कृषी ग्राहकांना जानेवारी, फेब्रुवारी व मार्च -२०१५ या त्रैमासिकाची वीज बिले माफ करण्यात आल्यावर शासनावर पडणा-या आर्थिकभाराच्या रकमेची परिगणना माहिती व तंत्रज्ञान विभागाने करावी, जेणेकरुन शासनाकडे प्रतिपूर्तीच्या रकमेच्या पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येईल.

सहपत्र : जिल्हानिहाय कृषीग्राहकांची संख्या

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत रवाना :- प्रेषण यादिप्रमाणे**

**प्रत सस्नेह रवाना:-**

मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान), महावितरण, मुंबई.

-- आपणांस कळविण्यात येते की, वरील विषया संदर्भात अवेळी पाऊस व गारपीटग्रस्त कृषी ग्राहकांना जानेवारी, फेब्रुवारी व मार्च -२०१५ ची वीज बिले शुन्य रक्कमेची आकारल्यानंतर वितरण कंपनीवर पडणा-या आर्थिक भाराची परिमंडळ व ग्राहक संख्यानिहाय माहिती त्वरीत पाठविण्यात यावी. जेणेकरुन शासनाकडून आर्थिक पूर्तत: करण्याकरीता प्रस्ताव पाठविण्यास मदत होईल.

**माहे नोव्हेंबर व डिसेंबर, 2014 या कालावधीत वादळी वारा, अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे ५० टक्केच्यावर नुकसान झालेल्या बाधित क्षेत्राची माहिती**

**क्षेत्र - हेक्टरमध्ये, निधी रुपये लाखात**

| अ. क्र. | जिल्हा | जिरायती पिके | | | बागायती पिके | | | फळपिके | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शेतकरी संख्या | बाधित क्षेत्र | अपेक्षित निधी | शेतकरी संख्या | बाधित क्षेत्र | अपेक्षित निधी | शेतकरी संख्या | बाधित क्षेत्र | अपेक्षित निधी | शेतकरी संख्या | बाधित क्षेत्र | अपेक्षित निधी |
| 1 | रायगड | 606 | 275.30 | 27.53 | 5 | 1 | 0.15 | 3679 | 1364.43 | 341.11 | 4290 | 1640.73 | 368.79 |
| 2 | नाशिक | 7436 | 699 | 69.90 | 29939 | 11741 | 1761 | 39465 | 17962 | 4490.50 | 76840 | 30402 | 6321.55 |
| 3 | धुळे | 2471 | 2343 | 234.30 | 1687 | 806 | 120.9 | 697 | 453 | 113.25 | 4855 | 3602 | 468.45 |
| 4 | नंदुरबार | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 16 | 6 | 1.50 | 16 | 6 | 1.50 |
| 5 | जळगाव | 0 | 0 | 0 | 13917 | 6428 | 964.2 | 3664 | 1232 | 308 | 17581 | 7660 | 1272.20 |
| 6 | अहमदनगर | 707 | 195 | 19.50 | 663 | 497 | 74.55 | 151 | 91 | 22.75 | 1521 | 783 | 116.80 |
| 7 | पुणे | 16105 | 4234 | 423.40 | 0 | 0 | 0 | 780 | 454 | 113.50 | 16885 | 4688 | 536.90 |
| 8 | सोलापूर | 0 | 0 | 0 | 2 | 2 | 0.3 | 27 | 17 | 4.25 | 29 | 19 | 4.55 |
| 9 | सातारा | 22 | 4 | 0.40 | 2859 | 448 | 67.2 | 91 | 42 | 10.50 | 2972 | 494 | 78.10 |
| 10 | सांगली | 168 | 58 | 5.80 | 3563 | 1448 | 217.2 | 5403 | 1477 | 369.25 | 9134 | 2983 | 592.25 |
| 11 | कोल्हापूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 35 | 12 | 3 | 35 | 12 | 3 |
| 12 | उस्मानाबाद | 0 | 0 | 0 | 1570 | 844 | 126.6 | 0 | 0 | 0 | 1570 | 844 | 126.60 |
| 13 | अमरावती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 99 | 65 | 16.25 | 99 | 65 | 16.25 |
| | एकूण | 27515 | 7808.30 | 780.83 | 54205 | 22215 | 3332 | 54107 | 23175.43 | 5793.86 | 135827 | 53199 | 9906.94 |